

# श्री संत ज्ञानेश्वर अभंगवाणी-रंगा येईं वो येईं

https://www.chalisa.online

रंगा येईं वो येईं, रंगा येईं वो येईं ।
विठाई किठाई माझे कृष्णाई कान्हाई ॥१॥

वैकुंठवासिनी विठाई जगत्र जननी ।
तुझा वेधु माझे मनीं ॥२॥

कटि कर विराजित मुगूट रत्नजडित ।
पीतांबरू कासिला तैसा येइ का धांवत ॥३॥

विश्व-रूपे विश्वं-भरे कमळ-नयनें कमळाकरे वो
तुझे ध्यान लागो बाप रखुमादेवीवरे वो ॥४॥

|| https://www.chalisa.online ||